सदरचा मुद्रांक लिव्ह ॲण्ड लायसेन्ससाठी नाही.
2017-18

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

100x2=200

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2017 ◐ SM 516853

अनुक्रमांक ११७७९ दिनांक ८/१२/१७ रुपये २००

मुद्रांक कोणत्या कारणासाठी वापरावयाचा आहे करार

मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे अनुच्छेद क्र.

मुद्रांक वापरणाराचे संपूर्ण नांव प्रा. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय

संपूर्ण पत्ता बारामती

हस्ते व्यक्तींचे नांव विकास जगताप

पत्ता बारामती

Mrs S.M. Tambade
सौ. एस.एम.तांबडे, मुद्रांक विक्रेती
परवाना क्र.११०३०२१/२०१८ पर्यंत नुतनीकृत
विक्री-आनंदनगर, बारामती, जि.पुणे

मुद्रांक घेणाऱ्याची/हस्ते व्यक्तीचे सही

उपकोषागार कार्यालय बारामती
27 NOV 2017
उपकोषागार अधिकारी
बारामती

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती व
निरामय मेडीकल ॲण्ड रिसर्च फौंडेशन, बारामती
या संस्थांमधील सामंजस्य करार

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महविद्यालय, बारामती हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेले ग्रामीण भागातील एक अग्रगण्य महाविद्यालय आहे. महाविद्यालयामध्ये सुमारे १०,००० विद्यार्थी कनिष्ठ, वरिष्ठ व पदव्युत्तर स्तरावर शिक्षण घेत असून जवळपास ४०० प्राध्यापक व २०० शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत आहेत.

७. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर सेवक निरामय मेडीकल फौंडेशनच्या हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल झाल्यास त्यांना फौंडेशनच्या वतीने हॉस्पीटल मधील कर्मचाऱ्यांप्रमाणे २५ % व लॅब, इसीजी, एक्स–रे इ. साठी १०% सूट देण्यात येईल.

८. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात निरामय मेडीकल फौंडेशन मधील सेवेत असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना नियमांच्या अधीन राहून प्राधान्याने प्रवेश देण्यात येईल.

९. निरामय मेडीकल फौंडेशनच्या स्टाफ व कर्मचाऱ्यांना तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील समृध्द ग्रंथालयाची सेवा उपलब्ध करुन देण्यात येईल.

१०. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील गरीब, गरजू व होतकरु विद्यार्थ्यांसाठी कमवा व शिका योजनेअंतर्गत निरामय मेडीकल फौंडेशनच्या हॉस्पिटलमध्ये उपलब्धते प्रमाणे काम देण्यात येईल.

११. सामंजस्य करार करणाऱ्या या दोन्ही संस्थांच्या नावाचा ठळक बोर्ड दोन्ही संस्थांच्या दर्शनी भागामध्ये लावण्यात येईल.

१२. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय व निरामय मेडीकल फौंडेशन या दोन्ही संस्थांना सहमतीने या करारातील तरतुदीमध्ये आवश्यक तो बदल करण्याचा अधिकार राहील.

१३. हा सामंजस्य करार पाच वर्षासाठी अंमलात येईल व त्यापुढे दोन्ही संस्थांच्या सहमतीने त्याची मुदत वाढविण्यात येईल.

हा सामंजस्य करार आज शुक्रवार दि. १५ डिसेंबर २०१७ रोजी दोन्ही संस्थांच्या सहमतीने करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| अध्यक्ष<br>निरामय मेडीकल फौंडेशन ॲण्ड<br>रिसर्च सेंटर, बारामती | प्राचार्य<br>तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय<br>बारामती |
| NIRAMAY MEDICAL FOUNDATION &<br>RESEARCH CENTRE PVT. LTD.<br>Gat.No.105,Plot No.245 to 249,Bhigwan Road,<br>JALOCHI,Tal-Baramati,Dist-Pune-413 102 | TULJARAM CHATURCHAND COLLEGE * BARAMATI<br>Principal<br>Tuljaram Chaturchand College<br>Baramati |

Niramay Medical Foundation & Research Center P.Ltd. Baramati

निरामय मेडीकल ॲण्ड रिसर्च फौंडेशन, बारामती हा बारामती शहरामध्ये वैद्यकीय क्षेत्रात नावलौकिक असलेला ट्रस्ट आहे. या ट्रस्ट मार्फत सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीकोनातून गरीब गरजू रुग्णांसाठी आरोग्यविषयक विविध उपक्रम राबविले जातात.

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय व निरामय मेडीकल ॲण्ड रिसर्च फौंडेशन या दोन्ही संस्था बारामती परिसरातील विद्यार्थी व नागरिकांच्या हितासाठी शैक्षणिक, सामाजिक व आरोग्य विषयक उपक्रम राबविण्यासाठी एकत्र येऊन खालीलप्रमाणे सामंजस्य करार करीत आहेत.

उपक्रम :

१. निरामय मेडीकल फौंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या आरोग्यविषयक व्याख्यानमाला व आरोग्य शिबीरे यांच्या आयोजनासाठी महाविद्यालय सर्व सहकार्य करील. या उपक्रमासाठी निमंत्रित करण्यात येणाऱ्या तज्ञ व्यक्तींना निमंत्रित करण्याची जबाबदारी निरामय मेडीकल फौंडेशन पार पाडेल.

२. निरामय मेडीकल फौंडेशनच्या वतीने तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर सेवक यांच्यासाठी वर्षातून एकदा आरोग्य विषयक शिबीर सवलतीच्या दरात आयोजित करण्यात येईल.

३. निरामय मेडीकल फौंडेशनच्या वतीने तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत दत्तक घेतलेल्या खेडेगावात वर्षातून एकदा विशेष हिवाळी शिबीराच्या कालावधीमध्ये गावातील सर्व नागरिकांसाठी आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात येईल.

४. निरामय मेडीकल फौंडेशनच्या वतीनें तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील विद्यार्थिनी, महिला कर्मचारी व प्राध्यापिकांसाठी विशेष आरोग्य विषयक उपक्रम राबविण्यात येईल.

५. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय व निरामय मेडीकल फौंडेशन या दोन्ही संस्था सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीने एकत्रितपणे पार पाडावयाच्या उपक्रमांची आर्थिक बाजू समान प्रमाणात सांभाळतील.

६. निरामय मेडीकल फौंडेशनला आपल्या उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी स्वयंसेवकांची गरज भासल्यास तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक उपलब्ध करुन देईल.